# छत्रपती शाहूंमुळेच सामाजिक क्रांती गतिमान

कोल्हापूर : छत्रपती शाहू महाराजांच्यामुळे सामाजिक क्रांती गतिमान झाली. शाहू महाराज हे सामाजिक क्रांतीचे अग्रदूत व थोर समाज सुधारक होते, असे प्रतिपादन ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले. ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृतीशताब्दीनिमित्त राजर्षी शाहू महाराजांचे कार्य, विचार व आजचे युग या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी ते बोलत होते.

डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, सामाजिक सलोखा हे शाहूंचे महत्वाचे कार्य होते. हिंदू-मुस्लिम ऐक्य या शाहूंच्या कार्यामुळेच कोल्हापूर जिल्ह्यात सदैव जातीय सलोख्याचे वातावरण आहे. त्यामुळेच आजच्या राजकीय दृष्ट्या प्रेरित झालेल्या जातीयतेच्या गदारोळात कोल्हापूर जिल्ह्यात सामाजिक शांतता टिकून आहे. याचे सर्व श्रेय शाहूंच्या विचाराला आहे. प्रास्ताविक प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी केले. स्वागत व सूत्रसंचन प्रा. डॉ. सुजय पाटील यांनी केले. आभार डॉ. अनिल घस्ते यांनी मानले. या प्रसंगी विद्यार्थिनी, प्राध्यापक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

18 मे 2022 दै. तरुण भारत

Scanned by CamScanner